# मिरा भाईदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ११/११/२०२० रोजी आयोजित केली आहे. सदर सभेकरीता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.

| प्रश्न | | उत्तर |
|---|---|---|
| १७. श्रीम. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०८/०२/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६ मधील प्रकरण क्र. ३२ मधील सुचना - पुतळे उभारण्याबाबत ठराव पास झाला त्यामध्ये मराठी मनातील ४ थोर महान पुरुष व माता (१) जिजा माता - मिरारोड स्टेशन बाहेर, (२) लोकमान्य टिळक - मॅक्सस मॉल चौकी जवळ (३) सावित्रीबाई फुले - नवघर मैदान (४) वि. वा. सावरकर - सावरकर चौक गोल्डन नेस्ट येथे पुतळे उभारणे या संदर्भात पुढील कार्यवाही काय केली व करणार? | | मा. महासभेच्या मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया करुन पुतळ्यासाठी चबुतरा बांधण्याची कामे मंजूर करण्यात येऊन शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पुतळा-3116/प्रक्र.308/29, दि. 2 मे 2017 अन्वये पोलीस विभागाकडे नाहरकत दाखला देण्यासाठी कळवून पाठपुरावा करण्यात येत आहे.<br>पुतळा उभारणाऱ्या संस्थांची नेमणूक करुन क्ले मॉडेलला कला संचालनालयाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. तद्नंतर मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव पाठवून रेखाचित्राबाबत मान्यता घ्यावयाची आहे. तसेच नगरविकास विभाग, मंत्रालय यांची मान्यता घेवून मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समिती समोर प्रस्ताव ठेऊन त्यांच्या मान्यतेने प्रत्यक्षात पुतळा बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |

| प्रश्न | | प्रभाग समिती क्र.१ | प्रभाग समिती क्र.२ | प्रभाग समिती क्र.३ | प्रभाग समिती क्र.४ | प्रभाग समिती क्र.५ | प्रभाग समिती क्र.६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २४/०७/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | | | | | | | |
| १) शहरामध्ये किती गॅरेजेस आहेत? प्रभाग | | २१ | २४ | ३५ | २५ | २० | ७५ | २०० |
| A) शहरामध्ये किती कार वॉशिंग सेंटर आहेत? | | ३ | ३ | ३ | २५ | ३ | ४ | ३८ |
| B) शहरामध्ये किती सर्विस सेंटर आहेत? | | २ | २० | १७ | २५ | | ३ | ७० |
| C) शहरामध्ये किती वाहन शोरुम आहेत? | | ५ | २ | ६ | १२ | ५ | ११ | ४१ |
| D) शहरामध्ये किती स्पेअर्स विक्रेते आहेत? | | ६ | ७ | ९ | २५ | ७ | १ | ५५ |
| E) वरील पैकी किती जणांनी मनपाचा परवाना घेतलेला आहे? | | ५ | ४ | ३ | २५ | ३ | २३ | ६३ |
| F) वरील व्यवसायासाठी प्रती परवाना १००००.०० प्रमाणे किती परवाना फी मनपाकडे जमा झालेली आहे? | | ३०,०००/- | २०,०००/- | ३०,०००/- | ९०,०००/- | ३०,०००/- | १,३०,०००/- | ३,३०,०००/- |
| G) किती व्यवसाय मनपा आरक्षण जागेत आहेत? | | निरंक | निरंक | निरंक | ३ | १ | निरंक | ४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| H) किती व कोणत्या प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणाला तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दि. | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| I) १५ दिवसात परवानगी न घेतलेल्या कोणत्या आस्थापनांना फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे? | | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| J) सदर व्यवसाय करणाऱ्यांनी मनपाचे रस्ते, पदपथ व इतर मोकळ्या जागेत वाहने उभी करुन मनपाला किती दंडाची रक्कम जमा केली? | | १९,२००/- | निरंक | निरंक | निरंक | निरंक | २४,०००/- | ४३,२००/- |
| K) प्रशासनाने सदर ठरावाची अंमलबजावणी केलेला सविस्तर अहवाल काय आहे? | | सोबत जा.क्र.मनपा/साबा./१३७७२/१७-१८, दि. ३१/३/२०१८ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. | | | | | | |
| १९. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २३/१२/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | | | | | | | |
| १) मिरारोड (पूर्व) शिवार गार्डन येथील वर्धमान फँन्टसी बी.ओ.टी. तत्वावर दिल्याची माहिती मिळणेबाबत. | | | | | | | | |
| अ) सदर सभागृह बी.ओ.टी. तत्वावर देण्याचा निर्णय मा. महासभा व मा. स्थायी समितीमध्ये केव्हा झाला (ठरावाची प्रत व भाडे कराराची प्रत देण्यात यावी.) | | सोबत मा. महासभा दि. 18/05/2006 ठराव क्र. 21, मा. स्थायी समिती सभा दि. 05/06/2007 ठराव क्र. 45, मा. महासभा दि. 01/03/2014 ठराव क्र. 96 (दि. 11/02/2014 रोजीची तहकुब सभा) ठरावाची व करारनाम्याची छायांकित प्रत. | | | | | | |
| ब) सदर कराराची सध्याची स्थिती काय आहे? | | सदर प्रकरण मा. लावादाकडे सुरु आहे. | | | | | | |
| क) सदर भाडेकरुने मनपाला अजूनपर्यंत किती भाडे भरले आहे? | | सदर जागेचे भाडे रु. 2,00,73,750/- महानगरपालिकेकडे जमा झाले आहे. | | | | | | |
| ड) सदर भाडेकरुने किती डिपॉझीट / बँक गॅरेंटी दिली आहे? | | सदर भाडेकरुने बँक गॅरंटी रुपाने रु.20,00,000/- भरणा केलेला आहे. सोबत छायांकित प्रत. | | | | | | |
| इ) सदर भाडेकरुने करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केल्यानंतर कोणती कारवाई करण्यात आली? | | सदर भाडेकरुचा दि. 28/07/2016 रोजी करारनामा रद्द करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी आरक्षण क्र. 262 संबंधित कामाकरीता दि. 30/09/2016 रोजी. मा. लवादाची नियुक्ती करण्यात आलेली असून मा. लवादाच्या कामाची कार्यवाही सुरु आहे. तथापी मा. लवादाचा निर्णय अद्याप अंतिम झालेले नाही. | | | | | | |
| २०. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २३/१२/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | | | | | | | |
| १) मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क येथील मिनाताई बाळासाहेब ठाकरे सामुदाईक हॉल (आरक्षण क्र. २३१) भाडे तत्वावर दिल्याची माहिती मिळणेबाबत. | | | | | | | | |
| अ) सदर सभागृह बी.ओ.टी. तत्वावर देण्याचा निर्णय मा. महासभा व मा. स्थायी समितीमध्ये केव्हा झाला (ठरावाची प्रत व भाडे कराराची प्रत | | सोबत मा. महासभा दि. २६/०२/२०१८, ठराव क्र. ९२ ची छायांकित प्रत. | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| देण्यात यावी.) | | |
| ब) सदर कराराची सध्याची स्थिती काय आहे? | | सदर सभागृहाचे वार्षिक भाडे रु. ४३,००,०००/- इतके आहे. |
| क) सदर भाडेकरुने मनपाला अजूनपर्यंत किती भाडे भरले आहे? | | सदर भाडेकरुने आजपर्यंत भाडे रक्कम रु. १०,७५,८७५/- भरणा केलेले आहे. |
| ड) सदर भाडेकरुने किती डिपॉझीट / बँक गॅरेंटी दिली आहे? | | सदर भाडेकरुने बँक गॅरंटीच्या रुपाने रु. ३५,००,०००/- भरणा केलेला आहे. सोबत छायांकित प्रत. |
| इ) सदर भाडेकरुने करारनाम्यातील अटीशर्तींचा भंग केल्यानंतर कोणती कारवाई करण्यात आली? | | सदर भाडेकरुने करारनाम्यातील अटींचा भंग केल्याने त्यास सदर सभागृहातील सामान काढून सभागृह रिकामी करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावे याबाबत नोटीस देण्यात आली होती. सोबत नोटीसची छायांकित प्रत. |
| २१. श्री. अनिल सावंत मा. सदस्य यांनी दि. २३/१२/२०१९ रोजी विचारलेला प्रश्न. | | |
| १) मिरारोड (पूर्व) इंद्रलोक येथील स्व. प्रमोद महाजन इमारती मधील सभागृह (आरक्षण क्र. २१८) भाडे तत्वावर दिल्याची माहिती मिळणेबाबत. | | |
| अ) सदर सभागृह बी.ओ.टी. तत्वावर देण्याचा निर्णय मा. महासभा व मा. स्थायी समितीमध्ये केव्हा झाला (ठरावाची प्रत व भाडे कराराची प्रत देण्यात यावी.) | | सोबत मा. महासभा दि. २६/०२/२०१८, ठराव क्र. ९१ ची छायांकित प्रत. |
| ब) सदर कराराची सध्याची स्थिती काय आहे? | | सदर सभागृहाचे वार्षिक भाडे रु. ५०,००,०००/- इतके आहे. |
| क) सदर भाडेकरुने मनपाला अजूनपर्यंत किती भाडे भरले आहे? | | सदर भाडेकरुने आजपर्यंत भाडे रक्कम रु. २५,००,०००/- ऑनलाईन भरणा केलेले आहे. |
| ड) सदर भाडेकरुने किती डिपॉझीट / बँक गॅरेंटी दिली आहे? | | सदर भाडेकरुने बँक गॅरंटीच्या रुपाने रु. ५०,००,०००/- भरणा केलेला आहे. सोबत छायांकित प्रत. |
| इ) सदर भाडेकरुने करारनाम्यातील अटीशर्तींचा भंग केल्यानंतर कोणती कारवाई करण्यात आली? | | सदर भाडेकरुने करारनाम्यातील अटींचा भंग केल्याने त्यास सदर सभागृहातील सामान काढून सभागृह रिकामी करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देण्यात यावे याबाबत नोटीस देण्यात आली होती. सोबत नोटीसची छायांकित प्रत. |

**(दिलीप ढोले)**
**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**